पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**ग** प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - **४**
सभावृत्तांत

दिनांक - ६/११/२०१७ वेळ - दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०६/११/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.श्री.अभिषेक गोविंद बारणे – सभापती**
२. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.बारणे अर्चना तानाजी
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.निलेश हिरामण बारणे
८. मा. बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
९. मा.सविता बाळकृष्ण खुळे
१०. मा.सुनिता हेमंत तापकीर
११. मा.चंद्रकांत बारकु नखाते

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

**श्री.**श्रीनिवास दांगट- **क्षेत्रिय अधिकारी**/प्रशासन अधिकारी, श्री.ओंभासे पी एस – कार्यकारी अभियंता, श्री.ओहोळ व्ही.बी - उपअभियंता, श्री.निंबाळकर एन आर – उप अभियंता, श्री.संदेश चव्हाण – कार्य.अभियंता विद्युत, श्री.बोनगीर ए.एम – लेखाधिकारी, श्री.कोळप एस. डी. - कार्यालय अधिक्षक(अतिक्रमण), श्री.एस.एस.कुळकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.आर.एन.बेद – मुख्य आरोग्य निरीक्षक,श्री.भाऊसाहेब साबळे –उप अभियंता पाणीपुरवठा, श्री.एस एस कुळकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी आरोग्य विभाग, श्री.निंबाळकर – उपअभियंता –स्थापत्य, श्री.नायडु ए.एस – स्थापत्य सहाय्यक, श्री.सतिष ए तायडे, श्री.संदिप पाडवी,श्री.कोटेवार एम बी - कनिष्ठ अभियंता, श्री.मोहिते एम. एस – उपअभियंता, श्री.मगर एस. एम, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.घोडके पी पी, श्री.गजपुरे व्ही.पी,

श्री.मोरमारे एस व्ही, श्री.मोमीन ए.ए, श्री.कोटेवार एम.बी – कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), श्री.मोहिते एम एस – उपअभियंता, - दिलीप धुमाळ – उप अभियंता – विद्युत, श्री.मगर अनिल - क्रिडा पर्यवेक्षक, श्री.जी.एन.खैरे – सहा.उद्यान निरीक्षक, श्री.बी.के.तापकीर – सहा.उद्यान निरीक्षक, श्री.निलेश दाते – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा,श्री.पुजारी सदाशिव – आरोग्य निरीक्षक इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

अ) दि. ०३/१०/२०१७ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ३ )

कायम करणेत येत आहे.

-------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक- १

दिनांक- ६/११/२०१७

सूचक- मा. उषा संजोग वाघेरे अनुमोदक- मा.निलेश हिरामण बारणे

संदर्भ – मा. उषा वाघेरे यांचे दि. २०/०९/२०१७ चे पत्र.

मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार पिंपरी येथील प्रभाग क्रमांक २१ मधील अयप्पा मंदिरा जवळील संडास ब्लॉक असुन वापरास योग्य नसुन सदर ठिकाणी बहुतांशी सिंधी समाज वास्तव्यास असुन त्यांचे स्वत:चे घरात शौचालय आहे, सदर संडास ब्लॉकचा वापर रहदारी वाले वापरत असल्यामुळे दुर्गंधी पसरुन रोगराई वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणाच्या वास्तव्यास असणा-या नागरिकांच्या तक्रारी वरुन सदर संडास ब्लॉक पाडण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे सदर ठिकाणी सुलभ शौचालय उभारणेबाबत मान्यता मिळालेनंतर सदर शौचालय पाडणेत यावेत, या ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेत यावेत.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक- २
दिनांक- ६/११/२०१७
सूचक- मा. उषा संजोग वाघेरे अनुमोदक - निलेश हिरामण बारणे
संदर्भ – मा. उषा वाघेरे यांचे दि. २०/०९/२०१७ चे पत्र.

मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील पी.सी.एम.सी.कॉलनी जवळ असलेले मुतारी व संडास ब्लॉक हे वापरण्यास योग्य नाहीत, तसेच जवळ परिसरात इंडस्ट्रीज एरिया असल्यामुळे निवासी मोजकीच आहेत व त्यांचे स्वत:चे शौचालय असल्यामुळे त्यांना त्याचा वापर होत नसुन, सदर ठिकाणी धुम्रपान तसेच मद्यपी लोकांचा वापर जास्त होतो, त्यामुळे सदर ठिकाणी अस्वच्छता वाढली असुन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे, तरी सदर संडास ब्लॉक व मुतारी पाडण्याच्या ठरावास मान्यता देणेबाबत विचार करणे. सदर ठिकाणी सुलभ शौचालय उभारणेबाबत मान्यता मिळालेनंतर सदर शौचालय पाडणेत यावेत, या ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेत यावेत.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक- ३
दिनांक- ६/११/२०१७
सूचक- मा. अनुमोदक -
संदर्भ – नगररचना व विकास विभाग यांचेकडील पत्र .नरवि/कावि/६/थेरगाव/१२९९/२०१७ दि.२०/०९/२०१७ चे पत्र..

मौजे थेरगाव येथील रोजवुड हॉटेल ते थेरगाव गावठाण या २४.० मी रस्त्यापासुन उत्तरेकडील स.नं.२७ पासुन १२.० मी रस्ता नव्याने प्रस्तावित करुन सदर रस्ता आरक्षण क्र.६२७ पैकी प्राथमिक शाळा या आरक्षणास लागुन ३४.५० मी रस्ता ते स.नं.२६,२७,२८ व २९ या आरक्षणातील १२ मी रस्त्यापर्यंत नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत घोषित करणेबाबत मा. “ब” प्रभाग समितीने वरील संदर्भिय ठरावान्वये यापुर्वी मान्यता दिलेली आहे. सदरचे रस्ते घोषित करणेकामी मा.आयुक्त यांनी दि.२५/०४/२०१७ चे प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे, त्याअनुषंगाने सदर मौजे थेरगाव येथील रोजवुड हॉटेल ते थेरगाव गावठाण या २४.० मी रस्त्यापासुन उत्तरेकडील स.नं.२७ पासुन १२.० मी रस्ता नव्याने प्रस्तावित करुन सदर रस्ता आरक्षण क्र.६२७ पैकी प्राथमिक शाळा या आरक्षणास लागुन ३४.५० मी रस्ता ते स.नं.२६,२७,२८ व २९ या आरक्षणातील १२.० मी रस्त्यापर्यंत नव्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत घोषित करणेकामी नागरीकांच्या सुचना व हरकती मागविणेकामी दैनिक पुढारी, दैनिक सामना, दै.नवभारत, जाहिरात क्र.५७० यामध्ये दि.२६/५/२०१७ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने ३० दिवसांचे विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही.

सदरचे रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये अंतिम घोषित करणेकामी सदर प्रस्तावास मा.ग प्रभाग समितीची अंतिम मंजुरी आवश्यक आहे. तरी प्रस्तुत रस्ते अंतिम घोषित करुन कायम करणेसाठी मा.ग प्रभाग समितीची मान्यता मिळणेबाबत विचार करणे.

सदरचा विषय तहकुब करण्यात येत असुन पुढील सभेचे वेळी सदर विषय घेणेत यावा.

-------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक- ४

दिनांक- ६/११/२०१७

सूचक- मा. कैलास भालचंद्र बारणे अनुमोदक – मा.मनिषाताई प्रमोद पवार

**संदर्भ –** मा.अर्चना बारणे,मा.निलेश बारणे,मा.सचिन भोसले,मा.मनिषा पवार,मा.झामाताई बारणे, मा.माया बारणे व मा.कैलास बारणे यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.

मा.अर्चना बारणे,मा.निलेश बारणे,मा.सचिन भोसले,मा.मनिषा पवार,मा.झामाताई बारणे, मा.माया बारणे व मा.कैलास बारणे यांनी दिलेल्या पत्रानुसार, प्रभागातील औंध रावेत बी आर टी मार्गावरील सबवे कावेरीनगरकडे जाणा-या रस्त्यात ज्या शेतक-यांची जमीन गेली आहे, सदर सबवेचे नाव **"कै.ह.भ.प.नारायण लक्ष्मण पवार"** असे नामकरण करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष
ग प्रभाग समिती
थेरगाव– ३३.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/२/ ४० /२०१७
दिनांक - २९/११/२०१७

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
क्षेत्रीय कार्यालय,
थेरगाव – ३३

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.